**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**
**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**

पत्र क.नाविमं/प.उ.मा./585
नागपूर दि.14/02/2023

प्रति,

मा.संचालक ,
माहिती प्रसिध्दी व
जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषयः–1. फेब्रूवारी/मार्च–2023 च्या इ. 10 वी व 12 वी परीक्षा कॉपीमुक्त अभियान बैठकीबाबत.
2.फेब्रू/मार्च–2023 च्या माध्यमिक शालांत (इ.10 वी )उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी )परीक्षेकरिता दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरित करण्याची कार्यपध्दती बंद करणेबाबत.

संदर्भ :–1.राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र./परीक्षा–7/0732 दिनांक– 10/02/2023.
2.राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र./परीक्षा–7/0733दिनांक– 10/02/2023.

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रू/मार्च–2023 च्या माध्यमिक शालांत (इ.10 वी ) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी ) कॉपीमुक्त अभियानाबाबत सोबत जोडलेल्या प्रेसनोट ला तसेच दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरित करण्याची कार्यपध्दती बंद करणेबाबतच्या प्रकटनास कृपया आपल्या कार्यकक्षेतील वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सोबतः– राज्य मंडळ प्रकटनाची व प्रेसनोट ची प्रत
प्रतिलिपीः–

1. सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2. मुख्याध्यापक/प्राचार्य सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,नागपूर विभाग नागपूर. आपल्या कार्यकक्षेतील सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

## प्रकटन

**विषय :–** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून प्रश्नपत्रिका दहा मिनिटे अगोदर वितरीत करणेची कार्यपध्दती बंद करण्याबाबत.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणा–या परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी (आकलन होण्यासाठी) परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर करण्यात येत होते.

परंतु प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत. इ. १० वी व इ. १२ वी च्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. पेपरफुटीच्या अशा अफवांमुळे परीक्षार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण होतो. तसेच यामुळे मंडळाची प्रतिमा जनमानसात मलिन होते. यापूर्वी परीक्षा दालनात परीक्षार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिकांचे वितरण केल्यामुळे परीक्षा केंद्रावर निर्धारीत वेळेनंतर पोहोचणा–या विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये प्रश्नपत्रिकेचा आशय आढळून आल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत.

अशा प्रकारच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात येत आहे.

सर्व परीक्षार्थ्यांनी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी किमान अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोहोचण्याच्या सूचना शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत. तसेच परीक्षार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रवेशपत्रातही (Hall Ticket) नमूद करण्यात आले आहे. सकाळ सत्रात स. १०.३० वाजता तसेच दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षा केंद्रावर परीक्षार्थ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

फेब्रुवारी–मार्च २०२३ परीक्षेपासून सकाळ सत्रात स. ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु. ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल.

परीक्षा दालनात ज्या क्रमाने परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप होईल, त्याच क्रमाने परीक्षेचा कालावधी संपल्यानंतर लिखित उत्तरपत्रिका परीक्षार्थ्यांकडून गोळा करण्याच्या सूचना सर्व दालन पर्यवेक्षकांना संबंधित परिरक्षक व केंद्रसंचालक यांचेमार्फत देण्यात येणार आहेत.

स्वाक्षरीत

(अनुराधा ओक)

**सचिव,**

**राज्य मंडळ, पुणे ४.**

# प्रेसनोट

**विषय :—** इ. १२ वी व इ. १० वी परीक्षा कॉपीमुक्त अभियानाची बैठक.

आज दि. १० फेब्रुवारी, २०२३ रोजी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली सकाळी १०.०० वाजता इ. १० वी व इ. १२ वी परीक्षांचे आयोजन कॉपीमुक्त वातावरणात होण्यासाठी दृकश्राव्य माध्यमाद्वारे बैठक (व्ही. सी.) आयोजित करण्यात आलेली होती.

सदर बैठकीस मा. पोलीस महासंचालक, मा. अपर मुख्य सचिव ग्रामविकास विभाग, मा. प्रधान सचिव शालेय शिक्षण विभाग, मा. आयुक्त शिक्षण, अध्यक्ष राज्य मंडळ तसेच राज्यातील सर्व मा. विभागीय आयुक्त, मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस आयुक्त, मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय मंडळ अध्यक्ष, विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी माध्य. हे उपस्थित होते.

इ. १० वी व इ. १२ वी च्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक महत्वपूर्ण टप्पा असल्यामुळे पालक व समाज घटक यांचे या परीक्षांकडे बारकाईने लक्ष असते. प्रश्नपत्रिका मोबाईलवर तसेच अन्य समाज माध्यमातून व्हायरल झाल्याच्या अफवा व काही अंशी अशा घटना निदर्शनास आलेल्या आहेत. पेपरफुटीच्या अशा अफवांमुळे परीक्षार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण होतो.

पेपरफुटीच्या घटनांना प्रतिबंध व्हावा तसेच परीक्षा निकोप, भयमुक्त व कॉपीमुक्त वातावरणात सुरळीत पार पडाव्यात यासाठी परीक्षेच्या निर्धारीत वेळेपूर्वी दहा मिनिटे अगोदर प्रश्नपत्रिका वितरीत करण्याची सुविधा फेब्रुवारी—मार्च २०२३ परीक्षेपासून रद्द करण्यात येत आहे.

तसेच सकाळ सत्रात स. १०.३० वाजता व दुपार सत्रात दु. २.३० वाजता परीक्षा केंद्रावर परीक्षार्थ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्ष प्रश्नपत्रिका वितरण सकाळ सत्रात स. ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दु. ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल.

जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर शिक्षण विभागाकडून नेमण्यात येणा—या भरारी पथकांशिवाय मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस आयुक्त / मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समन्वयातून भरारी पथके व बैठी पथके नियुक्त करण्यात येणार आहेत. या सर्वांचे सहकार्याने परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडेल असा मंडळास विश्वास आहे.

प्रश्नपत्रिकेची गोपनीयता अबाधित राहण्यासाठी मुख्य परीक्षा केंद्रावर प्रश्नपत्रिका पोहोच करण्याकरीता व उत्तरपत्रिका आणण्याकरीता नेमण्यात आलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी प्रवासादरम्यान जीपीआरएस प्रणाली सुरू ठेवणे आवश्यक करण्यात आलेले आहे.

मंडळामार्फत इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ठ होणा—या परीक्षार्थ्यांना गैरप्रकार केल्यास कोणत्या परिणामास सामोरे जावे लागेल याबाबत सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत यापूर्वीच कळविण्यात आलेले आहे.

स्वाक्षरीत/—

(अनुराधा ओक)

**सचिव,**

**राज्य मंडळ, पुणे ४.**